# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 16 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १६ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

राज्य विधीमंडळाचं अधिवेशन आज नागपूर इथं सुरु झालं. विधानसभेत कामकाज सुरु होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवीन मंत्र्यांचा परिचय करुन दिला. त्यानंतर यावर्षीच्या पुरवणी मागण्या मंत्री उदय सामंत यांनी सादर केल्या.

काँग्रेसचे नाना पटोले यांनी बीड जिल्ह्यातल्या माजी सरपंचाची हत्या आणि परभणी इथल्या हिंसाचाराचा मुद्दा उपस्थित केला. सरकारने यासंदर्भात उत्तर देण्याची मागणी त्यांनी केली. यावर सरकार चर्चा करण्यास तयार असल्याचं मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितलं. परभणी आणि बीड मधल्या घटना गंभीर असून, विरोधकांनी याचं राजकारण न करता विधायक सूचना सभागृहात चर्चेदरम्यान कराव्यात, अशी अपेक्षा, त्यांनी व्यक्त केली.

मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेच्या पटलावर आठ विधेयकं सादर केली. माजी राज्यपाल एस एम कृष्णा आणि विधानसभा सदस्य दिनकरराव जाधव यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव संमत होऊन, विधानसभेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं.

****

विधान परिषदेतही विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगच्या सरपंचाच्या हत्येचा मुद्दा उपस्थित केला. हे प्रकरण सीआयडीकडे सोपवण्यात आलं असून, विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. तीन आरोपींना अटक करण्यात आली असून, याप्रकरणातल्या दोषींवर कारवाई करण्याचं त्यांनी आश्वासन दिलं.

विधानपरिषदेतही माजी राज्यपाल एस एम कृष्णा आणि माजी विधानसभा सदस्य दिनकरराव जाधव यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव संमत करुन कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं.

दरम्यान, अधिवेशन सुरु होण्यापूर्वी विरोधी पक्ष सदस्यांनी विधिमंडळाच्या पायऱ्यावर ईव्हीएम विरोधात आंदोलन केलं. ईव्हीएम हटवा लोकशाही वाचवा अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या.

****

राज्यसभेत आज संविधानावरच्या चर्चेला सुरुवात झाली. देशाने राज्यघटना स्वीकारुन ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त ही विशेष चर्चा होत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी या चर्चेला सुरुवात करताना, राज्यघटना तयार करणार्या सर्वांचं स्मरण केलं. या पवित्र दस्तऐवजात अंतर्भूत असलेल्या भावनेला कायम ठेवणारा भारत निर्माण करण्याचा संकल्प करण्याची हीच वेळ असल्याचं त्या म्हणाल्या.

उद्यापर्यंत राज्यसभेत यावर चर्चा होणार असून, भाजपनं आपल्या खासदारांना व्हिप जारी करुन आज आणि उद्या सभागृहात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

****

प्रख्यात तबलावादक उस्ताद जाकीर हुसैन यांचं अमेरिकेत निधन झालं, ते ७३ वर्षांचे होते. हृदयविकाराशी संबंधित त्रासामुळे त्यांना सॅनफ्रान्सिस्को इथल्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं, उपचारादरम्यान रात्री उशीरा त्यांचं निधन झालं.

जाकीर हुसैन यांनी सहा दशकांच्या कारकिर्दीत तबला वादनाला नवी ओळख मिळवून दिली. जगभरात विविध कलावंतांसोबतचं त्यांचं जुगलबंदी सादरीकरण हा रसिकांसाठी अद्भुत अनुभव ठरत असे. विविध चित्रपट आणि जाहिरातपटातून भूमिका केलेले जाकीर हुसैन यांचा भारत सरकारने पद्मश्री, पद्मभुषण आणि पद्मविभुषण सन्मानाने गौरव केला आहे. तबल्यावर थिरकणारी त्यांची जादुई बोटं आणि त्यातून उमटणारा अलौलिक तालध्वनि, रसिकांच्या मनावर सदैव अधिराज्य करत राहतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रातल्या मान्यवरांनी झाकीर हुसैन यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

****

विजय दिवस आज साजरा होत आहे. १९७१ साली झालेल्या भारत पाक युद्धात भारतानं आजच्या दिवशी पाकिस्तावर विजय मिळवत ९३ हजाराहून अधिक पाकिस्तानी सैनिकांना युद्धबंदी केलं होतं. यानंतर पूर्व पाकिस्तान वेगळा होऊन

बांग्लादेशची निर्मिती झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी विजय दिवसानिमित्त राष्ट्रीय युद्ध स्मारकावर हुतात्म्यांना अभिवादन केलं.

भारतीय सेना, नौदल आणि हवाई दलाच्या अधिकाऱ्यांनी विजय दिवसानिमित्त पश्चिम बंगाल इथल्या विजय स्मारक आर्मी मुख्यालय ईस्टर्न कमांड इथं पुष्पहार अर्पण करुन हुतात्मा सैनिकांना अभिवादन केलं.

****

राज्य सरकारनं हमीभावानं सोयाबीन खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यात १४ डिसेंबरपर्यंत ५५१ खरेदी केंद्रांवर, केवळ एक लाख ३१ हजार टन सोयाबीनची खरेदी झाल्यानं, शेतकऱ्यांना नोंदणीसाठी १५ डिसेंबरवरून ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात यासाठी ५८१ केंद्रांना खरेदीची परवानगी देण्यात आली असून, त्यातले ५५१ केंद्रं सुरू असल्याची माहिती सहकार आणि पणन विभागानं दिली.

****

बॉर्डर – गावस्कर कसोटी क्रिकेट मोलिकेतल्या तिसर्या सामन्यात भारतानं पहिल्या डावात चार बाद ४८ धावा केल्या, त्यानंतर पावसामुळे खेळ थांबवण्यात आला. तत्पूर्वी आजचा खेळ सुरु झाला तेव्हा ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव ४४५ धावांवर संपुष्टात आला. जसप्रित बुमराहनं सहा, मोहम्मद सिराजनं दोन, तर नितीश कुमार रेड्डी आणि रविंद्र जडेजानं एक गडी बाद केला.

****

परभणी जिल्ह्यात आज ही थंडीचा जोर कायम असून, सकाळी चार पूर्णांक एक अंश सेल्सिअस या निचांकी तापमानाची नोंद झाली. नाशिक जिल्ह्यातही तापमानात घट झाली आहे. आज निफाडमध्ये पाच पूर्णांक सहा, तर नाशिकमध्ये नऊ पूर्णांक चार अंश सेल्सिअस तापमान नोंदवलं गेलं.

****